Shram Seva Nyas
1360, Shukrawar Peth,
Keshav-Madhav Sabhagruh
Behind Saraswati Mandir,
Natubag, Pune 411 002.
Tel. : 477070. Fax : 471616.
Regd. No. Maharashtra 8027/93

**SAFETY ENVIROMMENT PROTECTION FORUM**
*A Wing of Shramseva Nyas*

संदर्भ क्र. :- ५.११ / १०/ ०५

दि. २ मे २००५

## श्रम-सेवा न्यास - सुरक्षा व पर्यावरण रक्षक कृतीमंच
## आयोजित
## 'पर्यावरण चळवळीतील कार्यकर्त्यांचा सत्कार

मा. डॉ. प्रकाश गोळे

स. न. वि. वि.

समाजजीवनावर बरेवाईट परिणाम करणा-या विविध घटनांवर तज्ञांच्या विचारमंथनातून विधायक समाजकारणाच्या दिशेने जागृती घडवून आणणे ही 'श्रमसेवा' न्यासाची प्रमुख भूमिका आहे. गेली सुमारे १० वर्षे, न्यास हे कार्य विविध प्रकल्प हाती घेऊन व 'विकल्पवेध' या पाक्षिकाच्या माध्यमांतून अनेकविध विषय अधिकाधिक लोकांपर्यंत चिकाटीने पोचविण्याचा प्रयत्न करीत आहे.

जागृत नागरिकांना, शास्त्रज्ञांना, दूरदृष्टी असणा-या राजकीय नेत्यांना नैसर्गिक संपत्तीच्या वाढत्या -हासाने अस्वस्थ केले आहे. प्राचीन वने, औषधी वनस्पती, नद्या, जलस्रोत, ओझोनचे थर इ. हळूहळू नष्ट होण्याच्या भयाने जगापुढे आव्हान उभे राहिले आहे. सुदैवाने आपल्या देशांत या भयावह संकटांस तोंड देण्यास बळ देणा-या, तळमळीने कार्य करणा-या शासकीय तसेच अशासकीय स्वयंसेवी संस्था व व्यक्ती (संख्येने जरी कमी असल्या तरी) अनेक प्रशासकीय अडचणींना व अपु-या आर्थिक तरतुदींना तोंड देत कार्यरत आहेत.

पर्यावरणाच्या या अत्यंत जिव्हाळ्याच्या क्षेत्रात न कंटाळता कार्यरत असणाऱ्या पुणे परिसरातील अशा काही शासकीय व अशासकीय संस्थांच्या कार्याची अधिक जवळून माहिती मिळवून त्यांची कृतज्ञतापूर्वक दखल घ्यावी, या हेतूने ' श्रमसेवा न्यासाने' या संस्थांचा व कार्यकर्त्यांचा, रविवार दि. २९ मे २००५ या दिवशी ५ जूनच्या 'जागतिक पर्यावरण दिना'निमित्त संस्थेच्या सभागृहांत सत्कार करण्याचे ठरविले आहे.

या कार्यक्रमांत आपल्या संस्थेने हा सत्कार स्वीकारण्यासाठी प्रतिनिधी पाठवावा अशी आमची आग्रहाची विनंती आहे. या निमित्ताने संबंधित संस्थेने आपल्या उपक्रमांवर ५ ते ७मिनिटांचे सादरीकरण करावे अशी अपेक्षा आहे.

आपल्या संस्थेचे माहितीपत्रक, नियतकालिक, भित्तीचित्रे इ. साधने असल्यास ती श्रमसेवा न्यासाच्या कार्यालयांत २० मे २००५ पूर्वी पोचतील अशा रीतिने पाठविल्यास संस्थेच्या सभागृहांत ती सर्वांच्या माहितीसाठी ठेवण्यांत येतील. आपण ती जरुर पाठवावित.

आपल्या माहितीसाठी श्रमसेवा न्यासाचे विकल्पवेध हे पाक्षिक व संस्था-परिचयपत्रक या पत्राबरोबर पाठवित आहोत. आपण हे आमंत्रण स्वीकारले आहे हे कळल्यास आम्हाला आनंद होईल.

कळावे,

आपले स्नेहकांक्षी,

**श्री. मुकुंद गोरे**
संयोजक, श्रमसेवा न्यास

**श्री. सूर्यकांत परांजपे**
निमंत्रक, सुपर कृती मंच